# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-४०** **दिनांक - ९/०२/२०२४**

## बलात्कार करुन नजरेआड असणा-या आरोपीतास पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा - भाईदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय हद्दीतील विविध गंभीर गुन्हयातील पाहिजे निष्पन्न परंतु नजरेआड असणारे आरोपी यांना पकडणे बाबत मा. वरिष्ठांनी मोहिम राबवीणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत सन २०२१ पासून ते माहे नोव्हेंबर २०२३ पावेतो फिर्यादी यांचे राहते घरी अमान नगर, टाकीपाडा,नालासोपारा पश्चिम,ता-वसई,जि- पालघर येथे आरोपीत नामे - मोहम्मद गुलजार शेख याने स्वतःच्या मुलीसोबत जबरदस्तीने शारिरिक संबंध बनवून शिवीगाळ करुन मारहाण केली तसेच बघुन घेण्याची धमकी दिली तसेच फिर्यादी यांना देखील आरोपी पती हा स्वतःच्या घरी बंद करुन ठेवत असे.तसेच आरोपी मुलगा तौफिक याने देखील फिर्यादी यांच्या दोन्ही मुलींना हाताने मारहाण केले बाबत नालसोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५३५/२०२३ भा.द.वी. कलम ३७६(२), (n), ३४२, ३१२, ३२३, ५०४, ५०६, ३४, ३५४- A प्रमाणे दिनांक १४/११/२०२३ रोजी फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद आहे.

सदर संवेदनशील व गंभीर गुन्हयातील आरोपी याचा शोध घेणे करीता मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे एक पोलीस पथक तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन आरोपीत नामे - १) मोहम्मद गुलजार गुल मोहम्मद शेख वय ५३ वर्षे, रा. मुमताज अपार्टमेंट, अमन नगर, गास रोड, टाकीपाडा, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक ०७/०२/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपीत याचे कडे प्राथमिक तपास करता तो मागील ३ महिण्यापासुन औरंगाबाद, मुंबई येथे आपले अस्तित्व लपवुन दडुन राहत असल्याची माहिती समोर आली आहे. नमुद आरोपीत यास पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.आरोपीत यास अटक करण्यात आली असुन १६/०२/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. प्रविण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ / संतोष चव्हाण नेम - सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.